नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - ३१ Issue - 31 | वार - गुरुवार दि. २५ जून २०२६ Blow- Thursday Date 25 JUNE 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# डिस्कव्हरी व जिओग्राफी दूरचित्रवाहनीद्वारे वारी सोहळा पोहचणार जगभर

## आषाढी वारीत भाविकांची कोणतीही गैरसोय होणार नाही; वारकऱ्यांच्या सेवेसाठी शासन सज्ज : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : आषाढी वारी ही वारकरी संप्रदायाच्या श्रद्धेचा आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा महत्वपूर्ण सोहळा आहे. यंदाच्या वारीत लाखो भाविकांची कोणतीही गैरसोय होणारं नाही यासाठी सर्व विभागांच्या समन्वयातून व्यापक नियोजन करण्यात यावे. वारीचा उपक्रम डिस्कव्हरी व जिओग्राफी दूरचित्रवाहिनीद्वारे जगभरात पोहोचणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

विधानभवनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली तीर्थक्षेत्र पंढरपूर येथील आषाढी एकादशीच्या अनुषंगाने पूर्वतयारीबाबत आढावा बैठक झाली, त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. बैठकीस उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर, सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, पालखी सोहळा प्रमुख प्रतिनिधी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मागील वर्षी निर्मलवारी उपक्रम प्रभावीपणे राबविला असून यंदाचीही वारी सर्वांच्या सहकार्याने आणि पांडुरंगाच्या आशिर्वादाने यशस्वीपणे पार पडेल असे नियोजन करावे. यंदाच्या वारीसाठी पालखी मार्गावरील रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरुस्ती आणि मजबुतीकरण करण्यात आले. तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या माध्यमातून विविध विकासकामे पूर्ण करण्यात आली आहेत. त्यामुळे पालखी मार्गावरील प्रवास अधिक सुरक्षित आणि सुलभ होणार आहे. वारकऱ्यांच्या मुक्कामस्थळी मोठ्या प्रमाणावर जर्मन हँगर उभारण्यात आले असून संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज तसेच इतर पालख्यांच्या मुक्कामस्थळी जर्मन हँगरची व्यवस्था करण्यात आली आहे. यामुळे लाखो वारकऱ्यांना सुरक्षित आणि प्रशस्त निवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे.



पुणे विभागाबाहेरील पालख्यांनाही सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. त्यासाठी सोलापूर जिल्ह्यांचे पालकमंत्री यांची नोडल पालकमंत्री व पुणे विभागीय आयुक्त यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. डीजे मुक्त वारी सोहळ्यासाठी पोलीस प्रशासनाने सर्वांशी चर्चा करून प्रयत्न करावेत. वारी सोहळा हा पारंपरिक पद्धतीनेच साजरा करण्याचे आवाहनही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केले.

पालखी सोहळा प्रमुखांनी केलेल्या मागण्याचा सकारात्मक विचार केला जाईल असे ही मुख्यमंत्री यांनी यावेळी सांगितले.आषाढी वारी हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक जीवनाचा आत्मा आहे. लाखो वारकरी भाविकांना सुरक्षित, स्वच्छ आणि सुसज्ज सुविधा उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी आहे. सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करून वारकऱ्यांना सर्वोत्तम सुविधा द्याव्यात. यंदाची वारी अधिक सुरक्षित, सुकर आणि संस्मरणीय करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या की, पालखी सोहळा प्रमुखांनी ज्या ज्या मागण्या केल्या होत्या त्याप्रमाणे पालखी सोहळ्यातील सर्व कामे पूर्ण केली आहेत. महिलांसाठी रात्रीच्या मुक्कामाची विशेष सुरक्षितता घेतली आहे. वारकरी आणि भक्तांची काळजी घेत हा सोहळा चांगल्या प्रकारे साजरा करण्याचे आवाहनही यावेळी उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी केले.

ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, पालखी मार्गावर वारकरी आणि भक्तांसाठी सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.पालखी सोहळ्यात वारक-यांची गैरसोय होणार नाही याची काळजी घेतली आहे.पंढरपूर शहरात वारी सोहळ्यात आणि सोहळ्यानंतर स्वच्छतेचे सर्व नियोजन केले असल्याचे ही पालकमंत्री गोरे यांनी यावेळी सांगितले.

पुणे विभागीय आयुक्त शितल तेली - उगले यांनी सादरीकरणाद्वारे प्रशासनाने केलेल्या तयारीची माहिती दिली. बैठकीस संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी, जिल्हा प्रशासन, आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, पाणीपुरवठा, पोलीस आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

## प्रिंटमध्ये तांत्रिक चुका; मने दुखावली असल्यास दिलगिरी व्यक्त करतो : नार्वेकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी मराठी भाषेतून शोकप्रस्ताव मांडताना झालेल्या अशुद्ध उच्चारणांमुळे समाजमाध्यमांवर प्रचंड ट्रोलींग सुरू झाल्याने, या संपूर्ण प्रकरणावर बुधवारी विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सभागृहात स्पष्टीकरण दिले आहे. शोकप्रस्तावाच्या छापील प्रतींमधील (प्रिंट) तांत्रिक चुका आणि बारीक फॉन्टमुळे वाचनादरम्यान हा अनपेक्षित प्रकार घडला. या घटनेमुळे जर सभागृहातील किंवा राज्यातील कोणत्याही व्यक्तीचे मन दुखावले गेले असेल, तर मी त्याबद्दल मनापासून दिलगिरी व्यक्त करतो, असे अध्यक्ष म्हणाले. या प्रकाराबाबत सविस्तर खुलासा करताना अध्यक्ष राहुल नार्वेकर म्हणाले, अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी प्रथेप्रमाणे आपण शोकप्रस्ताव घेत असतो आणि ते केवळ अध्यक्षांनीच वाचून दाखवायचे, असा निर्णय झाला होता. त्या दिवशी पटलावर एकूण १२ शोकप्रस्ताव होते, ज्यांचे वाचन मी सभागृहात केले. हे १२ शोकप्रस्ताव ज्या कागदावर प्रिंट होऊन आले होते, त्याचा फॉन्ट अत्यंत बारीक आणि अस्पष्ट होता. त्या प्रिंटमध्ये काही तांत्रिक चुका होत्या, ज्या सुरुवातीला कोणाच्याच लक्षात आल्या नाहीत. परिणामी, समोर जसे आले होते तसे वाचन केल्यामुळे ही अनपेक्षित चूक घडली. गेली साडेचार वर्षे मी या सर्वोच्च सभागृहात अध्यक्ष म्हणून काम पाहत आहे. या प्रदीर्घ कार्यकाळात मी अनेक भाषणे आणि शोकप्रस्ताव मराठीतच मांडले आहेत. तसेच सभागृहाची संपूर्ण नियमावली आणि दैनंदिन कार्यपद्धती मराठी भाषेतूनच हाताळली आहे. मराठी भाषेबद्दल या सभागृहातील सदस्यांना आणि राज्यातील प्रत्येक नागरिकाला जेवढा जाज्वल्य अभिमान आहे, तेवढाच किंवा त्यापेक्षा अधिक अभिमान मला स्वत:ला मराठी भाषेबद्दल आहे.

## राज्यात आणखी ८८ नवी महसूल कार्यालये : महसूलमंत्री बावनकुळे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यातील महसूल प्रशासन अधिक सक्षम, गतिमान आणि लोकाभिमुख करण्याच्या उद्देशाने प्रस्तावित ८८ नवीन महसूल कार्यालयांच्या निर्मितीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. राज्य शासनाने या कार्यालयांबाबत हरकती व सूचनांसाठी १५ दिवसांची जाहीर सूचना प्रसिद्ध करण्याचे निर्देश दिले आहेत. यामध्ये १० अपर जिल्हाधिकारी कार्यालये, ७ उपविभागीय कार्यालये, २ तहसीलदार कार्यालये आणि ६९ अपर तहसीलदार कार्यालयांचा समावेश आहे. हरकतींचा एकत्रित अहवाल १२ जुलै २०२६ पर्यंत शासनाकडे सादर केला जाणार आहे.

नागरिकांना विविध दाखल्यांसाठी किंवा सरकारी कामांसाठी लांबचा प्रवास करावा लागू नये, म्हणून हा मोठा निर्णय घेण्यात आला आहे. नवीन कार्यालयांची निश्चिती करताना लोकांचे म्हणणे ऐकून घेतले जाणार आहे. या कामासाठी प्रशासकीय जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. या संदर्भातील हरकतींवर काम पाहण्यासाठी अपर जिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय कार्यालय, तहसीलदार कार्यालयाची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांकडे असेल. अपर तहसीलदार कार्यालया संदर्भातील संपूर्ण काम उपविभागीय अधिकारी पाहतील.

नागरिकांकडून आलेल्या सर्व अर्जांची आणि हरकतींची रोजच्या रोज तपासणी केली जाईल. जिल्हाधिकारी या सर्व माहितीवर आपले स्पष्ट अभिप्राय देऊन तो अहवाल विभागीय आयुक्तांकडे पाठवतील. सर्व विभागीय आयुक्तांनी आपापल्या विभागातील माहिती एकत्र करून १२ जुलै २०२६ पर्यंत अंतिम अहवाल सरकारकडे विनाविलंब सादर करायचा आहे. या नवीन योजनेमुळे संपूर्ण महाराष्ट्रातील प्रमुख ठिकाणांवर नवीन कार्यालये सुरू होणार आहेत. नवीन अपर जिल्हाधिकारी कार्यालये पुढीलप्रमाणे आहेत. कल्याण (ठाणे), दापोली (रत्नागिरी), बारामती (पुणे), फलटण (सातारा), पंढरपूर (सोलापूर), किनवट (नांदेड), अचलपूर (अमरावती), पुसद (यवतमाळ), खामगाव (बुलढाणा) आणि नागपूर (ग्रामीण)

रचना अशी...

१) नवीन उपविभागीय कार्यालये : मुंबई शहरातील फोर्ट, मुंबई उपनगरातील बोरीवली, तसेच शहापूर (ठाणे), देवगड (सिंधुदुर्ग), साक्री (धुळे), जामनेर (जळगाव) आणि सिन्नर (नाशिक). २) नवीन अपर तहसीलदार कार्यालये : मुंबई उपनगरातील चेंबूर, मालाड, वांद्रे; ठाणे जिल्ह्यातील डोंबिवली, बेलापूर; पुणे जिल्ह्यातील चाकण आणि नाशिकमधील लासलगाव व सिन्नर यांसारख्या मोठ्या गावांचा यात समावेश आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल प्रशासन अधिक सक्षम करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे.

राज्यातील नागरिकांना महसूल विभागाच्या सेवा अधिक जलद, पारदर्शक आणि त्यांच्या जवळ उपलब्ध व्हाव्यात, यासाठी नवीन महसूल कार्यालयांची निर्मिती करण्यात येत आहे. प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांचा सकारात्मक विचार करून अंतिम निर्णय घेतला जाईल.




### विधानसभा आणि विधान परिषदेतील महिला आमदारांच्या विशेष समितीची घोषणा

## 'कॉर्पोरेट जिहाद' रोखण्यासाठी कायद्यात बदल होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई (प्रतिनिधी) : राज्यातील बहुराष्ट्रीय आणि आयटी कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या उच्चशिक्षित महिलांना लक्ष्य करून त्यांचे सक्तीने धर्मांतर करणे, मानसिक छळ आणि लैंगिक शोषण करण्याचे अत्यंत धक्कादायक प्रकार अलिकडच्या काळात उघडकीस आले आहेत. या गंभीर प्रकरणांची दखल घेत, कॉर्पोरेट क्षेत्रातील महिलांना सुरक्षित वातावरण देण्यासाठी आणि या नव्या स्वरूपाच्या संघटित गुन्हेगारीला रोखण्यासाठी विद्यमान कायद्यांमध्ये व्यापक सुधारणा व बदल करण्यात येतील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी विधान परिषदेत दिली. शिवाय खासगी क्षेत्रातील महिलांच्या सुरक्षेसाठी आणि कायद्यातील त्रुटी दूर करण्यासाठी दोन्ही सभागृहांच्या (विधानसभा आणि विधान परिषद) महिला सदस्यांची एक विशेष समिती स्थापन करण्याची घोषणाही त्यांनी केली. भाजप आमदार चित्रा वाघ यांनी विधान परिषदेत लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून नाशिकमधील टीसीएस आणि पुण्यातील विप्रो कंपनीतील 'कॉर्पोरेट जिहाद' धक्कादायक उदाहरणे देऊन प्रशासनाचे लक्ष वेधले. सभागृहात हा विषय मांडताना चित्रा वाघ म्हणाल्या, आतापर्यंत आपण गरीब, अडाणी किंवा ग्रामीण भागातील लोकांना पैशांचे आमिष दाखवून धर्मांतर केल्याचे प्रकार पाहिले आहेत. परंतु थेट वातानुकूलित (एसी) कार्यालयात काम करणाऱ्या, उच्चशिक्षित आणि सक्षम महिलांना जाणीवपूर्वक टार्गेट केले जात आहे. 'धर्म बदला, इस्लाम स्वीकारा, नाहीतर तुमचे करिअर संपवून टाकू, नोकरीवरून काढून टाकू' अशा धमक्या देऊन तरुणींवर प्रचंड मानसिक दबाव आणला जात आहे आणि त्यांचे लैंगिक शोषण केले जात आहे.

पॉश (लैंगिक छळवणूक प्रतिबंधक कायदा) सारखा कडक कायदा अस्तित्वात असतानाही कंपन्यांचे वरिष्ठ व्यवस्थापन अशा नराधमांना पाठीशी घालत असल्याचा आरोप त्यांनी केला. अंतर्गत तक्रार निवारण समित्यांचे (आयसीसी) नियम केवळ कागदावरच राहिले आहेत. त्यामुळे अशा प्रकरणांमध्ये पोलिसांनी आयसीसीच्या अहवालाची वाट न पाहता स्वदखल घ्यावी, गुन्हेगारांचे चारित्र्य प्रमाणपत्र कायमचे रद्द करून त्यांना ब्लॅकलिस्ट करावे आणि पीडित मुलींच्या सुरक्षेसाठी २४/७ गोपनीय ऑनलाईन पोर्टल व विशेष हेल्पलाईन सुरू करावी, अशी आग्रही मागणी वाघ यांनी केली.

सोलापूर आयटीआय ते मल्टिनॅशनल कंपन्यांमध्ये शोषणाचे जाळे या चर्चेत सहभागी होत शिवसेना आमदार मनीषा कायंदे यांनी या समस्येचा विस्तार किती भयानक आहे, हे काही उदाहरणांसह सभागृहासमोर मांडले. सोलापूरच्या शासकीय आयटीआयमधील तब्बल १५० विद्यार्थिनींना धर्मांतरासाठी असाच त्रास दिला जात असून त्यांच्या हस्तलिखित तक्रारी आपल्याकडे आल्याचे त्यांनी सांगितले.

## संपादकीय....

### जगभरात पोहोचणार वारी

आषाढी वारी ही वारकरी संप्रदायाच्या श्रद्धेचा आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा महत्वपूर्ण सोहळा आहे. यंदाच्या वारीत लाखो भाविकांची कोणतीही गैरसोय होणारं नाही यासाठी सर्व विभागांच्या समन्वयातून व्यापक नियोजन करण्यात यावे. वारीचा उपक्रम डिस्कव्हरी व जिओग्राफी दूरचित्रवाहिनीद्वारे जगभरात पोहोचणार असल्याचे नुकतेच मुख्यमंत्र्यांनी सांगितले. विधानभवनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली तीर्थक्षेत्र पंढरपूर येथील आषाढी एकादशीच्या अनुषंगाने पूर्वतयारीबाबत आढावा बैठक झाली. मागील वर्षी निर्मलवारी उपक्रम प्रभावीपणे राबविला असून यंदाचीही वारी सर्वांच्या सहकार्याने आणि पांडुरंगाच्या आशिर्वादाने यशस्वीपणे पार पडेल असे नियोजन करावे. यंदाच्या वारीसाठी पालखी मार्गावरील रस्त्यांची मोठ्या प्रमाणात दुरुस्ती आणि मजबुतीकरण करण्यात आले. तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या माध्यमातून विविध विकासकामे पूर्ण करण्यात आली आहेत. त्यामुळे पालखी मार्गावरील प्रवास अधिक सुरक्षित आणि सुलभ होणार आहे. वारकऱ्यांच्या मुक्कामस्थळी मोठ्या प्रमाणावर जर्मन हँगर उभारण्यात आले असून संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज तसेच इतर पालख्यांच्या मुक्कामस्थळी जर्मन हँगरची व्यवस्था करण्यात आली आहे. यामुळे लाखो वारकऱ्यांना सुरक्षित आणि प्रशस्त निवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे. पुणे विभागाबाहेरील पालख्यांनाही सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येतील. त्यासाठी सोलापूर जिल्ह्यांचे पालकमंत्री यांची नोडल पालकमंत्री व पुणे विभागीय आयुक्त यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. डीजे मुक्त वारी सोहळ्यासाठी पोलीस प्रशासनाने सर्वांशी चर्चा करून प्रयत्न करावेत. वारी सोहळा हा पारंपरिक पद्धतीनेच साजरा करण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले. पालखी सोहळा प्रमुखांनी केलेल्या मागण्याचा सकारात्मक विचार केला जाईल असे ही मुख्यमंत्री यांनी यावेळी सांगितले. आषाढी वारी हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक जीवनाचा आत्मा आहे. लाखो वारकरी भाविकांना सुरक्षित, स्वच्छ आणि सुसज्ज सुविधा उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी आहे. सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करून वारकऱ्यांना सर्वोत्तम सुविधा द्याव्यात. यंदाची वारी अधिक सुरक्षित, सुकर आणि संस्मरणीय करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. पालखी सोहळा प्रमुखांनी ज्या ज्या मागण्या केल्या होत्या त्याप्रमाणे पालखी सोहळ्यातील सर्व कामे पूर्ण केली आहेत. महिलांसाठी रात्रीच्या मुक्कामाची विशेष सुरक्षितता घेतली आहे. वारकरी आणि भक्तांची काळजी घेत हा सोहळा चांगल्या प्रकारे साजरा करण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले. पालखी मार्गावर वारकरी आणि भक्तांसाठी सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.पालखी सोहळ्यात वारक-यांची गैरसोय होणार नाही याची काळजी घेतली आहे.पंढरपूर शहरात वारी सोहळ्यात आणि सोहळ्यानंतर स्वच्छतेचे सर्व नियोजन करण्यात आले आहे.

# राजर्षी शाहू महाराज : सामाजिक समतेचा क्रांतीसूर्य

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक आणि लोककल्याणकारी इतिहासात छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचे स्थान अत्यंत मानाचे आणि अद्वितीय आहे. भारतीय समाजात सामाजिक न्याय, समता, शिक्षणाचा प्रसार आणि दुर्बल घटकांच्या सक्षमीकरणाचा विचार प्रत्यक्ष शासनकारभाराच्या माध्यमातून यशस्वीपणे राबविणारे ते पहिले लोकाभिमुख राजे म्हणून ओळखले जातात. एकीकडे भारतावर ब्रिटिश सत्ता होती, तर दुसरीकडे भारतीय समाज जातिभेद, अस्पृश्यता, अंधश्रद्धा, निरक्षरता आणि आर्थिक विषमता यांसारख्या अनेक समस्यांनी ग्रासलेला होता. अशा काळात कोल्हापूर संस्थानच्या गादीवर आरूढ झालेल्या शाहू महाराजांनी केवळ एक राजा म्हणून राज्यकारभार केला नाही, तर समाजातील वंचित, शोषित आणि उपेक्षित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले. म्हणूनच त्यांना 'राजर्षी' या उपाधीने गौरविण्यात आले आणि सामाजिक न्यायाच्या इतिहासात त्यांचे नाव अजरामर झाले.

२६ जून १८७४ रोजी कागलच्या घाटगे घराण्यात यशवंतराव जयसिंगराव घाटगे यांचा जन्म झाला. पुढे कोल्हापूर संस्थानच्या दत्तक विधी नंतर त्यांचे नाव शाहू छत्रपती ठेवण्यात आले. त्यांचे बालपण राजघराण्यात गेले असले, तरी त्यांच्या मनात सामान्य जनतेविषयी असलेली आस्था आणि सामाजिक प्रश्नांविषयीची संवेदनशीलता लहानपणापासूनच दिसून येत होती. त्यांचे शिक्षण राजकोटमध्ये झाले. शिक्षणादरम्यान त्यांनी आधुनिक विचार, लोकशाही मूल्ये, प्रशासनशास्त्र आणि सामाजिक वास्तव यांचा अभ्यास केला. भारतातील बहुजन समाजाची दयनीय अवस्था, शिक्षणापासून वंचित राहिलेली जनता, अस्पृश्यतेच्या विळख्यात अडकलेले लाखो लोक आणि स्त्रियांची दुय्यम स्थिती यांचे वास्तव त्यांनी जवळून अनुभवले. याच अनुभवांनी त्यांच्या मनात सामाजिक परिवर्तनाचा दृढ संकल्प निर्माण केला.


१८९४ मध्ये शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानचा कारभार हाती घेतला. त्या काळात बहुजन समाजाला शिक्षण, नोकरी, सामाजिक प्रतिष्ठा आणि राजकीय सहभाग यांपासून दूर ठेवले जात होते. प्रशासनात काही विशिष्ट वर्गांचे वर्चस्व होते. जातिव्यवस्थेच्या नावाखाली समाजात अन्याय आणि विषमता रुजली होती. अशा परिस्थितीत शाहू महाराजांनी राज्यकारभाराचा केंद्रबिंदू 'रयतेचे कल्याण' हा ठेवला. त्यांना वाटत होते की राज्यकर्त्यांचे कर्तव्य केवळ कर गोळा करणे किंवा कायदा-सुव्यवस्था राखणे एवढेच नसून समाजातील दुर्बल घटकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे, हा विचार शाहू महाराजांच्या संपूर्ण कार्यामागे दिसून येतो. शिक्षणाशिवाय समाजातील विषमता दूर होऊ शकत नाही, हे त्यांनी ओळखले होते. त्यामुळे त्यांनी शिक्षणाच्या प्रसारासाठी व्यापक धोरण स्वीकारले. बहुजन समाजातील विद्यार्थ्यांसाठी विविध वसतिगृहे सुरू करण्यात आली. मराठा, जैन, मुस्लिम, लिंगायत, दलित आणि इतर समाजघटकांसाठी स्वतंत्र वसतिगृहांची व्यवस्था करण्यात आली. गरीब विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली. ग्रामीण भागातील मुलांना शिक्षणाची संधी मिळावी यासाठी अनेक शाळा सुरू करण्यात आल्या. शिक्षण हा मोजक्या लोकांचा विशेषाधिकार नसून प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार आहे, अशी त्यांची धारणा होती.

सामाजिक न्यायाच्या क्षेत्रात शाहू महाराजांचे सर्वात मोठे योगदान म्हणजे आरक्षणाची अंमलबजावणी होय. २६ जुलै १९०२ रोजी त्यांनी मागासवर्गीय समाजासाठी सरकारी नोकऱ्यांमध्ये ५० टक्के आरक्षण जाहीर केले. हा निर्णय भारतीय इतिहासातील सामाजिक न्यायाच्या चळवळीतील मैलाचा दगड मानला जातो. समाजातील काही घटक शतकानुशतके शिक्षण आणि रोजगाराच्या संधींपासून वंचित राहिले होते. त्यामुळे त्यांना समान संधी मिळण्यासाठी विशेष उपाययोजना करणे आवश्यक आहे, असे शाहू महाराजांचे मत होते. आज भारतीय राज्यघटनेत समाविष्ट असलेल्या आरक्षणाच्या तत्त्वाचा पाया त्यांच्या या निर्णयात दिसून येतो. म्हणूनच त्यांना सामाजिक न्यायाचे जनक असेही संबोधले जाते.

अस्पृश्यता निर्मूलनासाठी त्यांनी केलेले कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. अस्पृश्यतेमुळे समाजातील लाखो लोकांना मानवी सन्मानापासून वंचित ठेवले जात होते. शाहू महाराजांनी या अमानुष प्रथेला कठोर विरोध केला. सार्वजनिक विहिरी, तलाव, धर्मशाळा, शाळा आणि सरकारी कार्यालये सर्वांसाठी खुली करण्यात आली. दलित समाजातील लोकांना शिक्षण, नोकरी आणि सामाजिक जीवनात समान संधी मिळाव्यात यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या मते मनुष्याची किंमत त्याच्या जन्मावर नव्हे, तर त्याच्या गुणांवर आणि कर्तृत्वावर ठरली पाहिजे. त्यामुळे त्यांनी जातीय श्रेष्ठत्वाच्या संकल्पनेला स्पष्टपणे नाकारले.

शाहू महाराजांनी १९१७ मध्ये प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. त्या काळात असा निर्णय घेणे अत्यंत धाडसी होते. यामुळे गरीब आणि मागास कुटुंबांतील मुलांनाही शिक्षणाची दारे खुली झाली. शिक्षणाच्या माध्यमातून समाजात आत्मविश्वास, स्वाभिमान आणि प्रगतीची प्रेरणा निर्माण होईल, असा त्यांचा विश्वास होता. आज शिक्षणाचा अधिकार हा ज्या प्रकारे लोकशाही व्यवस्थेचा अविभाज्य भाग मानला जातो, त्याची पायाभरणी शाहू महाराजांच्या अशा दूरदर्शी निर्णयांतून



झालेली दिसते.

स्त्री शिक्षण आणि स्त्रीसक्षमीकरण हे शाहू महाराजांच्या कार्याचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य होते. त्या काळात स्त्रियांना शिक्षण देणे समाजातील अनेकांना मान्य नव्हते. स्त्रियांना घराच्या चौकटीतच मर्यादित ठेवण्याची मानसिकता प्रबळ होती. परंतु शाहू महाराजांनी स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन दिले. मुलींसाठी शाळा सुरू केल्या, त्यांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले आणि स्त्री शिक्षणाबाबत समाजात जागृती निर्माण केली. शिक्षित स्त्री ही कुटुंब आणि समाजाच्या विकासाची गुरुकिल्ली आहे, असे ते मानत. त्यांनी विधवा पुनर्विवाहाला प्रोत्साहन दिले, स्त्रियांवरील अन्यायकारक प्रथांना विरोध केला आणि महिलांच्या सन्मानासाठी विविध उपाययोजना राबवल्या.

महात्मा जोतिराव फुले यांच्या विचारांचा शाहू महाराजांवर खोल प्रभाव होता. फुले यांनी सुरू केलेल्या सत्यशोधक चळवळीला त्यांनी सक्रिय पाठिंबा दिला. बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी, स्त्रियांच्या उन्नतीसाठी आणि सामाजिक समतेसाठी फुले यांनी जो संघर्ष केला, त्याला शाहू महाराजांनी प्रशासनाच्या माध्यमातून बळ दिले. त्यांनी सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांना प्रोत्साहन दिले आणि सामाजिक सुधारणांच्या कार्यासाठी आवश्यक पाठबळ उपलब्ध करून दिले. त्यामुळे महाराष्ट्रातील समाजसुधारणेच्या चळवळीला नवी ऊर्जा मिळाली.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक आणि राजकीय कार्याला प्रारंभीच्या काळात पाठबळ देणाऱ्या महत्त्वाच्या व्यक्तींमध्ये शाहू महाराजांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. डॉ. आंबेडकर यांच्या नेतृत्वाची क्षमता आणि त्यांचे सामाजिक भान शाहू महाराजांनी ओळखले होते. त्यांनी विविध प्रसंगी आंबेडकरांना प्रोत्साहन दिले आणि दलित समाजाच्या प्रश्नांवर त्यांच्या भूमिकेला पाठिंबा दिला. १९२० मध्ये माणगाव येथे झालेल्या परिषदेत शाहू महाराजांनी डॉ. आंबेडकरांविषयी व्यक्त केलेले गौरवोद्गार आजही प्रसिद्ध आहेत. सामाजिक न्यायाच्या लढ्यातील ही ऐतिहासिक मैत्री भारतीय इतिहासातील एक प्रेरणादायी घटना आहे.

शेतकरी आणि ग्रामीण विकासासाठी शाहू महाराजांनी अनेक महत्त्वपूर्ण उपाययोजना केल्या. भारत हा कृषिप्रधान देश असल्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनमानात सुधारणा होणे आवश्यक आहे, याची त्यांना जाणीव होती. त्यांनी सिंचन व्यवस्था विकसित केली, जलसंधारणाच्या योजना राबवल्या आणि कृषी विकासासाठी विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या. दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यात आली. ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करण्यासाठी त्यांनी सहकाराच्या तत्त्वालाही प्रोत्साहन दिले.

कामगार कल्याणाच्या क्षेत्रातही त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. औद्योगिक विकासासोबत कामगारांच्या हक्कांचे संरक्षण झाले पाहिजे, असे ते मानत. कामगारांना योग्य वेतन, सुरक्षित कामाचे वातावरण आणि मूलभूत सुविधा मिळाव्यात यासाठी त्यांनी विविध उपाययोजना केल्या. समाजातील प्रत्येक घटकाच्या विकासाला समान महत्त्व देणे हीच खरी लोककल्याणकारी शासनव्यवस्था आहे, असा त्यांचा दृष्टिकोन होता.

धार्मिक क्षेत्रात शाहू महाराजांचा दृष्टिकोन अत्यंत उदार आणि मानवतावादी होता. त्यांनी धर्माचा वापर समाजकल्याणासाठी व्हावा, अशी भूमिका घेतली. धर्माच्या नावाखाली होणाऱ्या भेदभावाला त्यांनी विरोध केला. सर्व धर्मांचा आदर राखत त्यांनी सामाजिक सलोखा आणि बंधुभावाचा पुरस्कार केला. त्यांच्या दृष्टीने मानवता ही कोणत्याही धर्मापेक्षा श्रेष्ठ होती.

सांस्कृतिक क्षेत्रातही त्यांनी मोलाचे योगदान दिले. साहित्य, संगीत, नाटक, लोककला आणि चित्रकला यांना त्यांनी सक्रिय प्रोत्साहन दिले. कलाकारांना आश्रय आणि आर्थिक मदत देऊन त्यांनी सांस्कृतिक विकासाला चालना दिली. कोल्हापूर हे सांस्कृतिक चळवळींचे महत्त्वाचे केंद्र बनले. समाजाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी संस्कृतीचे जतन आणि संवर्धन आवश्यक आहे, असे ते मानत. क्रीडा क्षेत्रात त्यांनी विशेषतः कुस्तीला दिलेले प्रोत्साहन उल्लेखनीय आहे. कोल्हापूरची कुस्ती परंपरा देशभर प्रसिद्ध होण्यामागे शाहू महाराजांचे मोठे योगदान आहे. त्यांनी आखाड्यांची उभारणी केली, पैलवानांना प्रोत्साहन दिले आणि क्रीडा संस्कृतीला प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. खेळांमुळे युवकांमध्ये शिस्त, आत्मविश्वास आणि आरोग्यदायी जीवनशैली विकसित होते, असा त्यांचा विश्वास होता.

प्रशासनाच्या क्षेत्रात शाहू महाराजांनी लोकाभिमुख शासनाचा आदर्श निर्माण केला. ते थेट जनतेशी संवाद साधत असत. सामान्य माणसांच्या समस्या समजून घेऊन त्यावर उपाययोजना करण्यावर त्यांचा भर असे. प्रशासनातील पारदर्शकता, कार्यक्षमता आणि उत्तरदायित्व यांना त्यांनी प्राधान्य दिले. त्यांच्या कारकिर्दीत कोल्हापूर संस्थान हे लोककल्याणकारी शासनाचे आदर्श उदाहरण बनले.

शाहू महाराजांचा स्वभाव अत्यंत साधा, विनम्र आणि संवेदनशील होता. राजेपद असूनही त्यांच्यात कोणताही अहंकार नव्हता. गरीब, शेतकरी, कामगार, दलित आणि वंचित समाजघटकांच्या दुःखाविषयी त्यांना प्रचंड कळकळ होती. त्यांनी राजसत्तेचा उपयोग स्वतःच्या वैभवासाठी न करता लोकांच्या उन्नतीसाठी केला. त्यामुळेच जनतेच्या मनात त्यांच्याविषयी अपार आदर निर्माण झाला आणि त्यांना 'राजर्षी' ही उपाधी प्राप्त झाली.

६ मे १९२२ रोजी मुंबई येथे त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने सामाजिक न्यायाच्या चळवळीतील एक तेजस्वी पर्व संपले; परंतु त्यांच्या विचारांचा प्रकाश आजही समाजाला दिशा देत आहे. शिक्षण, समता, सामाजिक न्याय, स्त्रीसक्षमीकरण आणि लोककल्याणकारी शासन या क्षेत्रांतील त्यांचे योगदान आजही प्रेरणादायी आहे. महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात त्यांच्या कार्याचा प्रभाव जाणवतो.

आजच्या काळात राजर्षी शाहू महाराजांचे विचार अधिकच महत्त्वपूर्ण वाटतात. विज्ञान, तंत्रज्ञान आणि आर्थिक विकासाच्या युगातही सामाजिक विषमता, शैक्षणिक असमानता आणि संधींचे असमान वितरण या समस्या कायम आहेत. अशा परिस्थितीत समाजातील वंचित घटकांना सक्षम करण्यासाठी शिक्षण, आरक्षण आणि सामाजिक न्यायाच्या धोरणांची आवश्यकता अधिक अधोरेखित होते. शाहू महाराजांनी शंभर वर्षांपूर्वी मांडलेले विचार आजही मार्गदर्शक ठरतात.

राजर्षी शाहू महाराज हे केवळ एका संस्थानचे अधिपती नव्हते, तर ते आधुनिक भारतातील सामाजिक लोकशाहीचे अग्रदूत होते. त्यांनी समतेवर आधारित समाजव्यवस्थेचे स्वप्न पाहिले आणि ते प्रत्यक्षात आणण्यासाठी आयुष्यभर कार्य केले. त्यांचे जीवन आपल्याला शिकवते की सत्ता ही लोकांच्या कल्याणासाठी वापरली गेली तरच तिचे खरे मूल्य सिद्ध होते. त्यांच्या कार्यामुळे लाखो वंचित लोकांच्या जीवनात आशेचा किरण निर्माण झाला.

दि. २६ जून रोजी त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांचे स्मरण करणे म्हणजे सामाजिक न्याय, समता आणि मानवतेच्या मूल्यांचा पुनरुच्चार करणे होय. समाजातील प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे, शिक्षण आणि विकासाच्या संधी सर्वांना समानपणे मिळाल्या पाहिजेत आणि कोणत्याही प्रकारचा भेदभाव स्वीकारला जाऊ नये, हा संदेश शाहू महाराजांच्या जीवनातून मिळतो. आज त्यांच्या जयंतीनिमित्त आपण समतामूलक, न्याय्य आणि सर्वसमावेशक समाजनिर्मितीचा संकल्प केला, तर तीच त्यांना खरी आदरांजली ठरेल. सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात राजर्षी शाहू महाराज हे सदैव तेजस्वी दीपस्तंभ म्हणून स्मरणात राहतील आणि त्यांच्या विचारांची प्रेरणा पुढील अनेक पिढ्यांना मार्गदर्शन करत राहील.

**– डॉ. राजेंद्र बगाटे,** (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत) ईमेल – bagate.rajendra5@gmail.com

## श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांची बदली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

श्री विठ्ठल रुक्मिणीचे कार्यकारी अधिकारी श्री राजेंद्र शेळके यांची कल्याणी ते उपविभागीय अधिकारी म्हणून बदली झाली आहे.

गेल्या दोन वर्षापासून श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीवर कार्यकारी अधिकारी म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. त्यांची बदली मोहीम म्हणून ती प्रयत्न करीत होती अखेर त्यांना यश आले आहे. त्यांची शासनाने पंढरपूर इथून कल्याण येथील उपविभागीय अधिकारी म्हणून बदली करण्यात आली आहे. त्यामुळे आता विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या कार्यकारी अधिकारी कधी कोणाची वर्णी



लागली लागणार आहे याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आषाढी यात्रेची तयारी प्रशासनाने सुरू केली आहे. मात्र यात्रेच्या अगोदरच राजेंद्र शेळके यांनी ही बदली झाली असल्याने त्यामुळे आषाढी यात्रेमधील काम करण्यास अडचणी वाचणार असल्याची दिसून येत आहे.

## असल्फा येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार सोहळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज : घाटकोपर पश्चिम असल्फा येथे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्म शताब्दी वर्षाचे औचित्य साधून प्रभाग क्रमांक १५९ मधील १० वी च्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ रविवारी दि २१ रोजी भानुशाली वाडी हॉल,खैराणी रोड, असल्फा या ठिकाणी शिवसाई मित्र मंडळ आणि सामाजिक कार्यकर्ते बाळकृष्ण गटे यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. दरम्यान जल्लोष महाराष्ट्राचा या सांस्कृतिक कार्यक्रमाने रंगत आणल्याने मोठ्या उत्साहपुर्ण वातावरणात कार्यक्रम पार पडला. यावेळी प्रभाग क्रमांक १५७ च्या नगरसेविका डॉ. सरिता म्हस्के, सामाजिक कार्यकर्ते नरसीभाई भानुशाली, धरमसीभाई भानुशाली यांसह अनेक मान्यवर,विद्यार्थी, पालक,आणि नागरिक उपस्थित होते.



विभागातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या कार्य कर्तुत्वाचा आणि नेत्र दिपक यशाचा यथोचीत सन्मान करून पुढील यशस्वी आणि उत्तुंग वाटचालीसाठी प्रेरणा आणि स्फूर्ती मिळावी या उद्देशाने गेली एकवीस वर्ष सातत्याने या कार्यक्रमाचे आयोजन केले जात असल्याचे आयोजक बाळकृष्ण गटे यांनी सांगितले.यावर्षी प्रथम श्रेणी आणि विशिष्ट प्राविण्य मिळवलेल्या सुमारे ३५० गुणवंत विद्यार्थ्यांना शालेय भेटवस्तू आणि सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात आले. विद्या सायन्स अक्॑डमी व रोहित कॉमर्स अक्॑डमी यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. विभागातील विद्यार्थ्यांनी एमपीएससी आणि युपीएससी परीक्षेची प्रेरणा घ्यावी याकरिता या परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना एक लाख रुपयाचे बक्षीस जाहीर करण्यात आल्याचे आयोजक बाळकृष्ण गटे यांनी यावेळी सांगितले.

## महापालिकेतील अधिकारी, कर्मचारी व नगरसेवकांसाठी कॅशलेस विमा योजनेला गती; स्वीकृत नगरसेवक केत यांच्या पाठपुराव्याला मोठे यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर /प्रतिनिधी : सोलापूर महानगरपालिकेतील अधिकारी, कर्मचारी तसेच नगरसेवकांना कॅशलेस आरोग्य विमा सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत स्वीकृत नगरसेवक तथा महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष केत यांनी केलेल्या मागणीला अखेर यश येताना दिसत आहे. महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत त्यांनी ही महत्त्वपूर्ण मागणी लावून धरली होती. त्यांच्या या मागणीची दखल घेत पालिका प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेत संबंधित प्रक्रिया सुरू केली आहे.

या योजनेच्या अंमलबजावणीसाठी महापालिकेतील सर्व अधिकारी, कर्मचारी आणि नगरसेवक यांची माहिती संकलित करण्याचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे येत्या काळात महापालिकेतील सर्व



घटकांना कॅशलेस आरोग्य विम्याचे संरक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

आरोग्यावरील वाढता खर्च आणि अचानक उद्भवणाऱ्या वैद्यकीय संकटांचा विचार करता अधिकारी, कर्मचारी व लोकप्रतिनिधींना आर्थिक आधार मिळावा, या उद्देशाने केत यांनी हा विषय सातत्याने मांडला होता. त्यांच्या या दूरदृष्टीपूर्ण भूमिकेमुळे हजारो कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांना मोठा दिलासा मिळणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

महापालिका प्रशासनाने या मागणीला दिलेला सकारात्मक प्रतिसाद हा केत यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचा आणि कर्मचारी हितासाठी केलेल्या प्रयत्नांचा विजय मानला जात आहे. कर्मचारी व नगरसेवकांच्या आरोग्य सुरक्षेसाठी उचललेले हे पाऊल भविष्यात महत्त्वपूर्ण ठरणार असून, सामाजिक बांधिलकी जपत केत यांनी पुन्हा एकदा कर्मचारी हिताचा मुद्दा प्रभावीपणे पुढे आणल्याची चर्चा महापालिका वर्तुळात सुरू आहे.

कर्मचारी, अधिकारी आणि नगरसेवकांच्या आरोग्य संरक्षणासाठी राबविण्यात येणारी ही कॅशलेस विमा योजना प्रत्यक्षात आल्यास ती सोलापूर महानगरपालिकेच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण आणि लोकहितकारी निर्णय ठरणार असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# राज्यातील ७५ टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा

## यावर्षाअखेरीस उर्वरित २५ टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा देण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात सध्या वीजेची कोणतीही टंचाई नसून कृषी पंपांना नियमानुसार दिवसा आठ तास वीजपुरवठा केला जात आहे. राज्यातील सुमारे ७५ टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीज उप-लब्ध झाली असून उर्वरित २५ टक्के शेतकऱ्यांनाही यावर्षाअखेरीस दिवसा वीजपुरवठ्याच्या कक्षेत आणण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानपरिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली.

याबाबत सदस्य सदाभाऊ खोत यांनी प्रश्न उपस्थित केला. तर सदस्य बच्चू कडू, प्रविण दरेकर यांनी उपप्रश्न उपस्थित केला.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मे महिन्यात काही वीज निर्मिती प्रकल्पांमध्ये एकाच वेळी तांत्रिक अडचणी निर्माण झाल्याने अल्पकाळासाठी भारनियमन करावे लागले होते. मात्र सध्या राज्यात कोणतेही भारनियमन करण्यात येत नाही. शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या सौर कृषी पंप योजनेंतर्गत विविध भौगोलिक परिस्थितींना अनुरूप मॉडेल विकसित करण्यात आली आहेत. नदीकाठ, पूररेषा, कालवे तसेच खोल जलस्रोतांमधून पाणी उपसा करण्यासाठी मोनोपोल, बूस्टर पंप आणि तरंगत्या सौर पंपांची यशस्वी अंमलबजावणी करण्यात आली आहे. गेल्या तीन वर्षांत राज्यात १० लाखांहून अधिक सौर पंप बसविण्यात आले असून शेतकऱ्यांकडून या योजनेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

वीज वितरण व्यवस्थेतील त्रुटी दूर करण्यासाठी केंद्र शासनाच्या आरडीएसएस योजनेअंतर्गत राज्यात सुमारे २५ हजार कोटी रुपयांची कामे सुरू करण्यात आली आहेत. यामध्ये फीडर विभक्तीकरण, नवीन उपकेंद्रे, अतिरिक्त रोहित्रे (डीपी) आणि वितरण यंत्रणेचे आधुनिकीकरण करण्यात येत आहे. पुढील तीन वर्षांत या कामांमुळे डीपी निकामी होण्याचे प्रमाण लक्षणीयरीत्या कमी होईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

डार्क झोन भागातील शेतकऱ्यांनाही दिलासा देण्यासाठी खोल जलस्तर असलेल्या भागांमध्ये अधिक क्षमतेचे पंप, बूस्टर पंप आणि त्यावर अनुदान देण्याची व्यवस्था केली आहे. तसेच सौर पंपधारकांना वीजबिलाचा कोणताही प्रश्न राहत नसल्याचेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातील वाढत्या वीज मागणीच्या पार्श्वभूमीवर २०३१-३२ पर्यंत ७८ हजार मेगावॅट वीज क्षमता उपलब्ध करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या क्षमतेचे प्रभावी वहन सुनिश्चित करण्यासाठी ट्रान्समिशन कॉरिडॉर उभारणीवर विशेष भर देण्यात येत असून टीबीसीबी पद्धतीद्वारे १६ हजार कोटी रुपयांची कामे सुरू झाली आहेत. पुढील तीन वर्षांत ट्रान्समिशन क्षेत्रात सुमारे ६० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. मुंबईच्या वीज सुरक्षेसाठी 'मुंबई आयलँडिंग' संकल्पनेअंतर्गत महत्त्वाचे ट्रान्समिशन कॉरिडॉर पूर्ण करण्यात आले असून आता मुंबईत अतिरिक्त ३ हजार मेगावॅट वीज आणण्याची क्षमता निर्माण झाली आहे. त्यामुळे कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत मुंबईचा वीजपुरवठा अबाधित ठेवणे शक्य होणार आहे.



पीएम सूर्य घर योजनेंतर्गत रूफटॉप सौर ऊर्जा निर्मितीत महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर पोहोचला असून गृहसंकुलांनी मोठ्या प्रमाणावर सौर ऊर्जा स्वीकारल्यास त्यांच्या सामाईक वीज खर्चात मोठी बचत होऊ शकते, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

# जय जवान क्रीडा मैदान कचऱ्याच्या विळख्यात

### मनपा एन विभाग घन कचरा व्यवस्थापन विभागाच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर,(केतन भोज);प्रभाग क्र.१२३ रामनगर ब मायकल डिसोजा चाळीच्या वरील बाजूस डोंगराळ भागात जय जवान क्रीडा मैदान हे परिसरातील मुलांसाठी उपलब्ध असलेले एकमेव मैदान असून,सध्या ते कचऱ्याच्या विळख्यात सापडल्याचे चित्र दिसत आहे. स्थानिक नागरिकांच्या मते,मैदानाच्या परिसरात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एन विभागांतर्गत घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या वस्ती स्वच्छता योजना आणि डीप क्लिनिंग ड्राईव्ह योजनेची कामे प्रभावीपणे होत नसल्याने येथे मोठ्या प्रमाणात कचरा साचला आहे.स्थानिक सामाजिक कार्यकर्ते प्रविण धुमाळ यांचा असा आरोप आहे की,मनपा एन विभाग संबंधित घन कचरा व्यवस्थापन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या सातत्याने होत असलेल्या दुर्लक्षामुळे मैदानाचे स्वरूप आता क्रीडांगणा ऐवजी डम्पिंग ग्राऊंडसारखे झाले आहे.मैदानाच्या विविध भागांत कचऱ्याचे ढीग,प्लास्टिक,बांधकामातील अवशेष आणि इतर घनकचरा मोठ्या प्रमाणावर साचला असून खेळाडू आणि नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.स्थानिक रहिवाशांच्या म्हणण्यानुसार,रामनगर आणि आसपासच्या डोंगराळ परिसरात मुलांना खेळण्यासाठी पर्यायी मैदान उपलब्ध नाही. अशा परिस्थितीत या एकमेव मैदानाची ही अवस्था झाल्याने मुलांच्या शारीरिक विकासावर आणि क्रीडा संस्कृतीवर विपरीत परिणाम होत आहे.नागरिकांनी महापालिका प्रशासनाकडे मैदानाची तात्काळ स्वच्छता करून नियमित डीप क्लिनिंग ड्राइव्ह तसेच वस्ती स्वच्छता योजना मोहीम राबविण्याची मागणी केली आहे.





एकीकडे मनपा प्रशासनाकडून खेळांना प्रोत्साहन देण्याच्या घोषणा केल्या जातात,तर दुसरीकडे मुलांसाठी उपलब्ध असलेले एकमेव मैदान कचऱ्याच्या ढिगाऱ्याखाली दबले जात आहे. अखेर स्थानिक मुलांनी खेळायचे कुठे? असा सवाल स्थानिक नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

**–प्रविण धुमाळ**,सामाजिक कार्यकर्ते

# नळदुर्ग येथे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर ग्रामीण विद्यार्थिनींना त्रैमासिक पासचे वाटप



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/ दादासाहेब बनसोडे

नळदुर्ग येथील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर ग्रामीण विद्यार्थीनीना त्रैमासिक १०० टक्के सवलतीच्या एस. टी. पासचे वाटप वाहतूक नियंत्रक महेश डुकरे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुभाष राठोड यांच्या हस्ते करण्यात आले.

आज महाविद्यालयात घेण्यात आलेल्या या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष राठोड यांच्या हस्ते वाहतुक नियंत्रक महेश डुकरे यांचा शाल व पुष्पहार घालून महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात येऊन उपस्थित विद्यार्थिनींना पासचे वाटप करण्यात आले.

### नळदुर्ग बसस्थानकाचे वाहतूक नियंत्रक महेश डुकरे यांचे केले प्राचार्य सुभाष राठोड यांनी कौतुक

या कार्यक्रमास महाविद्यालयाचे कार्यालयीन अधिक्षक धनंजय पाटील उपप्राचार्य डॉ.अशोक कदम, डॉ.एन. बी. जाधव, डॉ. दिपक जगदाळे, डॉ.एच. एम. मिर्जा, डॉ.अतिश तिडके,प्रा. एच. व्ही.पाटील, प्रा.के. पी.भोसले, प्रा.काळे के.एम. ,डॉ सावते बी.एस.,प्रा. पी. के.पिरजादे , डॉ.जयश्री घोडके, प्रा.झरीना पठाण प्रा.कल्पना जाधव, प्रा.उषा बदने , प्रा.बेले जी.डी., विजय सुरवसे,शाम पाटील यांच्यासह महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.



# पालखेड विद्यालयात योग दिन उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड /प्रतिनिधी : महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल,पालखेड येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाप्रसंगी मुख्याध्यापक अशोक शेळके यांनी योगदिनाचे महत्त्व समजावून सांगताना आजच्या चंगळवादी भोगवादी आणि सुखसाधनाच्या पाठीमागे धावणाऱ्या माणसाच्या मनाची शरीराची अवस्था आणि विविध आजारांनी बिकट झालेले आहे. त्यामुळे माणूस कुटूंबात, समाजात वावरत असताना चिडचिड बनतो. त्यामुळे माणसाची मनस्थिती अस्वस्थ होते. याचा परिणाम त्याचा दैनंदिन कामकाजावर आणि प्रगतीवर होतो. या सर्वांपासून माणसाचे शारीरिक मानसिक संतुलन चांगले राहावे यासाठी योगा महत्वाचा मानला जातो. योगा हि प्राचीन भारतीय संस्कृतीने जगाला दिलेली फार मोठी देणगी आहे.त्यामुळे समाजाने योग अभ्यास करून शारीरिक मानसिक संतुलन ठेवणे गरजेचे आहे. तरच आदर्श भारत हि संकल्पना सत्यात उतरेल असा विश्वास अशोक शेळके यांनी याप्रसंगी व्यक्त केला.यावेळी विद्यार्थी व शिक्षकांनी ताडासन,वृक्षासन,त्रिकोणासन,वीरभद्रासन, सुखासन, वज्रासन,पश्चिमोत्तानासन,अर्धमच्छेंद्रासन,भुजंगासन,धनुरासन,सेतुबंधासन यांसह विविध योगासने व व्यायाम घेण्यात आले.सदर राष्ट्रीय योगदिन कार्यक्रमाप्रसंगी मुख्याध्यापक अशोक शेळके,निलेश गवांदे,दीपक देशमुख, हेमंतकुमार होलगडे,सुनंदा दुर्दवळे,संजय लव्हंगडे, मंगेश कागदे,शैलेश शिखरे, किरण थेटे, राहुल दवते, वैशाली मोते, सागर जाधव,राजेंद्र नाठे,संदीप आहेर, दत्तात्रय पगार, सावंत जाधव,संजय कोकतरे, ज्ञानेश्वर मातेरे, कविता ढोमसे, सारिका पवळे,सुरेश गांगुर्डे,रामदास पवार, नदीम तांबोळी आदींसह विद्यार्थी उपस्थित होते.

# बी. बी. पाटील इंग्लिश स्कूलमध्ये जागतिक योग दिन साजरा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/ मिलिंद जाधव : जागतिक योग दिनानिमित्त भिवंडी तालुक्यातील कुरुंद येथील बी. बी. पाटील इंग्लिश हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज तसेच पडघा पोलीस स्टेशन, ठाणे ग्रामीण यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी उत्साहपूर्ण वातावरणात जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. धेसर षी जपश एरींीह, जपश क्शरश्रींह – योग एका पृथ्वीसाठी, एका आरोग्यासाठी या वर्षाच्या संकल्पनेला अनुसरून विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी आणि पोलीस अधिकाऱ्यांनी एकत्रित योगाभ्यास करत आरोग्याचा सामाजिक संदेश दिला.

### योगातून निरोगी जीवनाचा संदेश; विद्यार्थी, पोलीस व शांतता समिती सदस्यांचा उत्स्फूर्त सहभाग

कार्यक्रमाची सुरुवात सामूहिक योगाभ्यासाने झाली. यावेळी शाळेतील इयत्ता आठवीच्या विद्यार्थिनींनी ताडासन, वृक्षासन, वज्रासन, भुजंगासन, शवासन तसेच अनुलोम-विलोम यांसारख्या विविध योगासनांची प्रात्यक्षिके सादर केली. विद्यार्थिनींनी प्रत्येक आसनाचे शारीरिक व मानसिक आरोग्यावर होणारे सकारात्मक परिणाम समजावून सांगितले. दैनंदिन जीवनात योगाचे महत्त्व अधोरेखित करत उपस्थितांना योगाभ्यास करण्यासाठी प्रेरित केले.

या उपक्रमात विद्यार्थी, शिक्षक, पालक, पडघा पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी तसेच शांतता समितीच्या सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. सामूहिक योगाभ्यासाद्वारे निरोगी जीवनशैलीचा संदेश देण्यात आला. विशेष म्हणजे पोलीस अधिकारी आणि विद्यार्थ्यांनी एकत्र योगासने करत समाजामध्ये आरोग्य जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

कार्यक्रमास पडघा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक पंकज गिरी यांची विशेष उपस्थिती लाभली. यावेळी श्रीकांत गायकर, गुरुनाथ जाधव, केतन पाटील, तुकाराम बजागे, अजय डोळे, अशोक शेरेकर, शशिकांत ठाकरे, प्राथमिक व माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका अनामिका विशे, उच्च माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका मोनिका पाटील, शिक्षकवृंद, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सदर कार्यक्रमासाठी मुख्याध्यापिका अनामिका विशे यांचे मार्गदर्शन लाभले, तर सूत्रसंचालन राजश्री रत्नाकर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळा प्रशासन, शिक्षक आणि पडघा पोलीस स्टेशनच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

निरोगी शरीरात निरोगी मन वसते या संदेशासह पार पडलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, एकाग्रता, मानसिक संतुलन आणि आरोग्याविषयी जागरूकता निर्माण झाली. योग हा केवळ व्यायाम नसून निरोगी व सकारात्मक जीवनशैलीचा आधार आहे, हा संदेश या कार्यक्रमातून प्रभावीपणे देण्यात आला.

### आमदार अभिजित पाटील यांनी वेधले सभागृहाचे लक्ष

# जनतेच्या आरोग्यशी खेळणारे, दूध व गुटखा माफिया, भ्रष्ट अधिकारी यावर मोक्का'लावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

राज्यात भेसळ दूध व बनावटी, अवैद्य गुटका विक्री आणि या संपूर्ण राकेटला भ्रष्ट अधिकारी साखरेवर वरवरची कारवाई न करता मूळ सूत्रधारावर मोक्का अंतर्गत कठोर कारवाई करण्यात यावी अशी आक्रमक मागणी माढा विधानसभा मतदारसंघाची लोकप्रिय आमदार अभिजीत पाटील यांनी विधानसभेत केली आहे अन्न व औषध प्रशासन विभागाच्या डीसाळ कार्यपद्धतीवर आणि भ्रष्ट अधिकारी यावर थेट बोट ठेवत त्यांनी सभागृहांमध्ये लक्ष वेधले.

भोसरीतील बनावट दूध कारखान्याच्या गंभीर मुद्दा सभागृहात मांडताना आमदार पाटील यांनी सांगितले की, या छाप्यात तब्बल दीड कोटी लिटर बनव दूध तयार होईल इतके मेला 'मेला माईन'सारखे अत्यंत घातक रसायन जप्त करण्यात आले होते या प्रकरणात दोषीवर मोक्का लावण्याची आश्वासन शासनाने सभागृहात दिले होते मात्र आजपर्यंत कोणतेही ठोस कारवाई झाली नाही व जनतेच्या आणि निष्पाप लहान मुलांच्या आरोग्याची खेळणाऱ्या या माफी यांना नक्की कोणाचे राजकीय संरक्षण असा इथे सवाल त्यांनी उपस्थित केला.



दूध भेसळी सोबत राज्यातील गुटखा माफियांचे राकेट आणि त्यांनी पाठीशी घालणाऱ्या अधिकाऱ्यांवर ही त्यांना क** शब्दात त प्रहार केला आणि गावपरी सरास अवैध गुटखा पकडण्यासाठी गेलेल्या अधिकाऱ्यांच्या वाणाला धडक देऊन त्यांच्या जीवाला धोका निर्माण करण्यात आला होता मात्र शासनाने मुख्य गुटखा व्यापाऱ्याला सोडून केवळ वाहन चालकावर गुन्हा दाखल केला अशा गुटखा व्यवसायात पाठीशी घालणाऱ्या आणि हप्ते खोरे करणारे अधिकारी यावर गुन्हेगारावर गुन्हा दाखल कधी होणार असाही प्रश्न त्यांनी निर्माण केला.

पाटील यांनी सांगितले की ाह१३ सी के २१ ११ या वाहनातून तब्बल तीन कोटी ४२ लाख रक्कम जप्त करण्यात आली होती त्यामध्ये प्रशांत कुचेकर, अशोक गुप्ता आणि अशोक एलके यासारख्या अधिकाऱ्यांची भूमिका संसद पद असतानाही त्यांच्यावर केवळ शिस्तबंगाची किंवा विभागीय चौकशीची किरकोळ कारवाई करण्यात आली एवढी मोठी रक्कम सापडून ही कठोर कारवाई होत नसेल तर भ्रष्टाचाराविरोधी सरकारची भूमिका नेमकी काय आहे अशी शिंका त्यांनी व्यक्त केली या सभागृहात वारंवार नवी पुरावे आणि गाड्यांच्या नंबरावर ही सर्व माहिती देऊन कारवाई लांबणीवर पडत असल्याबद्दल त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

आमदार अभिजीत पाटील यांनी विधानसभेत उठवलेला हा आवाज महाराष्ट्रातील जनतेच्या आरोग्यासाठी आणि सुरक्षित साठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. 'मेला माईन'सारख्या विषारी रसायनापासून बनवणारी दूध रोखल्यास भविष्यात लहान मुले आणि नागरिकांना शुद्ध व दर्जेदार अन्नपदार्थ मिळतील त्यामुळे अन्नसुरक्षितेच्या बाबतीत कायद्यात वचक निर्माण होईल तसेच कर्करोगाला नियंत्रण देणाऱ्या पुढच्यावरही पूर्ण बंदी आल्यास पुढची पिढी निरोगी आणि व्यसनमुक्ती राहील त्यामुळे लोकांच्या आरोग्यावरील उपचाराचा मोठा खर्च वाचेल केवळ लहान कुकर्मचाराव कारवाई न करता मुख्य सूत्रधार व भष्ट अधिकाऱ्यांवर कारवाई करावी कारवाई करून जेलमध्ये पाठवल्यास प्रशासनाला पारदर्शकता येईल आणि गुन्हेगाराचे धाबे दणांतील जनतेच्या आरोग्यशी खेळणाऱ्या भ्रष्ट अधिकाऱ्याला संरक्षण देणे ही तात्काळ थांबवावी अशी ही मागणी केली आहे.

# यात्राकर अनुदानातून पंढरपूर नगरपरिषदेला ५ कोटींचा निधी प्राप्त

## आमदार समाधान आवताडे यांच्या पाठपुराव्याला यश; विकासकामांना मिळणार गती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर / प्रतिनिधी – आषाढी यात्रेच्या पार्श्वभूमीवर दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पंढरपूर नगरीतील विविध विकास कामांना चालना देण्यासाठी राज्य शासनाने यात्राकर रद्द केल्यामुळे नगरपरिषदांना देण्यात येणाऱ्या सहायक अनुदान योजनेअंतर्गत सन २०२६–२७ साठी एकूण ८ कोटी ७५ लाख रुपयांचा निधी मंजूर केला असून, त्यापैकी पंढरपूर नगरपरिषदेला तब्बल ५ कोटी रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात आले आहे. यासंदर्भातील शासन निर्णय नुकताच निर्गमित करण्यात आला आहे. याबाबत पंढरपूर–मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी शासन



स्तरावर सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाल्याने भाविक आणि स्थानिक नागरिकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे. या निधीमुळे पंढरपूर शहरातील विविध नागरी सुविधा व विकासकामांना गती मिळणार आहे.

राज्यातील त्र्यंबक, आळंदी, जेजुरी, पंढरपूर, तुळजापूर, रामटेक, पैठण आणि अक्कलकोट या आठ यात्रास्थळ नगरपरिषदांच्या हद्दीत पूर्वी आकारला जाणारा यात्राकर बंद केल्यानंतर शासनाकडून सहायक अनुदान दिले जाते. यंदा आमदार समाधान आवताडे यांच्या पाठपुराव्यामुळे पंढरपूरला संपूर्ण ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून, उर्वरित सात नगरपरिषदांसाठी एकूण ३ कोटी ७५ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. शासनाने हा निधी कोणतीही कपात न करता तात्काळ संबंधित नगरपरिषदांना वितरित करण्याचे निर्देश दिले आहेत.

तसेच निधीचा विनियोग नियमानुसार करून त्याबाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांकडून प्राप्त करून महालेखापाल कार्यालयाकडे सादर करण्याची जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे. निर्धारित मुद–तीत निधी खर्च न झाल्यास अखर्चित रक्कम व्याजासह शासनाच्या खात्यात जमा करावी लागणार आहे.

आमदार समाधान आवताडे यांनी सदर निधीबाबत वारंवार शासन दरबारी पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांमुळेच पंढरपूर नगरपरिषदेला ५ कोटी रुपयांचे अनुदान मिळाल्याची भावना नागरिक व भाविकांमधून व्यक्त केली जात आहे. या निधीमुळे आगामी काळात शहरातील मूलभूत सुविधा आणि विकासकामांना नवी गती मिळणार आहे.

# आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांच्या विशेष प्रयत्नांतून दिघंची जिल्हा हद्द ते वाणी चिंचाळे भोसे रस्त्यासाठी ३४२ कोटी मंजूर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



सांगोला विधानसभा मतदारसंघातील रस्त्यांच्या विकासासाठी आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे दिघंची जिल्हा हद्द ते खवासपूर–लोटेवाडी–सोनलवाडी–एखतपूर–सांगोला–वाढेगाव–मेडशिंगी आलेगाव–वाकी घेरडी–वाणी चिंचाळे ते भोसे रस्ता राज्य मार्ग ३८६ साठी ३४२ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. हा निधी तालुक्यातील विविध गावांमधील मुख्य रस्त्यांच्या सुधारणेसाठी वा–परला जाणार आहे.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांच्या कडे आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी सदरचा निधी उपलब्ध करून द्यावा ही मागणी अर्थसंकल्पीय अधिवेशनापूर्वी केली होती. या म ागणीची दखल घेत मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांनी तत्काळ निधी मंजूर केला असून निधी मंजूर केल्याबद्दल आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी मुख्यमंत्री महोदयांचे आभार मानले.

सदरचा रस्ता हा राज्य मार्ग क्रमांक ३८६ अंतर्गत दिघंची जिल्हा हद्द ते खवासपूर–लोटेवाडी–सोनलवाडी–एखतपूर–सांगोला–वाढेगाव–मेडशिंगी आलेगाव–वाकी घेरडी–वाणी चिंचाळे ते भोसे रस्ता पर्यंत असून या रस्त्यामुळे सांगोला तालुक्यातील शेतकऱ्यांना उत्पादन वाहतुकीसाठी मोठा फायदा होणार आहे. सध्या अनेक गावांम ध्ये रस्त्यांची अवस्था खराब असल्याने शेतमाल बाजारात नेणे कठीण होत होते. या विकासकाम ांमुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळेल, तसेच पायाभूत सुविधांना चालना मिळणार असून रोजगारात पण वाढ होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

सदरचा निधी मंजूर केल्याबद्दल मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना.सुनेत्राताई पवार, उपमुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे, सार्वजनिक बांधकाम मंत्री ना.शिवेंद्रराजे भोसले यांच्यासह ग्रामविकास मंत्री तथा सोलापूर जिल्हा पालकमंत्री ना.जयकुमार गोरे यांचे आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी आभार मानले.

# कृषी संशोधन केंद्र कुंदेवाडी येथे दर्जेदार बियाण्यांची विक्री सुरू

**शेतकरी बांधवांसाठी निफाड तहसील च्या वतीने महत्त्वाचे आवाहन**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड प्रतिनिधी – खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर दर्जेदार व प्रमाणित बियाण्यांचा वापर केल्यास उत्पादन वाढीस मोठी मदत होणार असून शेतकरी बांधवांसाठी कृषी संशोधन केंद्र, कुंदेवाडी ता. निफाड, जि. नाशिक येथे दर्जेदार व संशोधनाधारित बियाण्यांची विक्री सुरू करण्यात आली आहे, कांदा बियाणे – फुले समर्थ विक्री दर : ₹ २५०० प्रति किलो, लाल कांद्याची सुधारित वाण., चांगली उगवण क्षमता व एकसारखी वाढ. आकर्षक रंग, चांगला आकार व गुणवत्तापूर्ण कांदे. साठवणुकीसाठी तुलनेने योग्य. बाजारपेठेत चांगला प्रतिसाद मिळणारी वाण. असुन

सोयाबीन बियाणे :- फुले दूर्वा

विक्री दर : ₹ २६०० प्रति २६ किलो बॅग उच्च उत्पादनक्षम सुधारित वाण.

विविध हवामान परिस्थितींशी जुळवून घेण्याची क्षमता. रोग व कीड प्रादुर्भावास तुलनेने सहनशील. दाण्यांची उत्तम गुणवत्ता व चांगले तेलांश प्रमाण. खरीप हंगामासाठी उपयुक्त व विश्वासार्ह वाण. इच्छुक शेतकरी बांधवांनी कृषी संशोधन केंद्र, कुंदेवाडी येथे उपलब्ध असलेले फुले समर्थ कांदा बियाणे व फुले दूर्वा सोयाबीन बियाणे लवकरात लवकर खरेदी करून उपलब्धतेचा लाभ घ्यावा असे आवाहन कृषी संशोधन केंद्र कुंदेवाडी व तह–सील कार्यालय, निफाड यांची वतीने करण्यात आले आहे.

# जि.प.चे. सदस्य गण करणार आषाढी तयारीची पाहणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर प्रतिनिधी – आगामी आषाढी एकादशी यात्रेच्या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्ह्याचे सर्वसाधारण सभा पंढरपूर मध्ये घेण्यात येणार आहे सिरी कॉलेज येथे दिनांक २५ रोजी गुरुव–ारी घेण्यात येणार असल्याचे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष दीपक वैद्य यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. सभेपूर्वी आषाढी यात्रेचा यात्रेचा आढावा प्रत्यक्ष ठिकाणी घेण्यासाठी जिल्हा परिषद सदस्य व अधिकारी पालखी मोरा–वरील प्रत्येक ठिकाणची पाहणी करणार आहे.




**आषाढी वारी पूर्व नियोजनाला वेग: पालखी मार्गावरील विकास कामाची प्रत्यक्ष पाहणी पाणी सह नियोजन**

**यंदाची आषाढी वारी चांगल्या पद्धतीने पार पाडण्यासाठी जिल्हा परिषदेच्या वतीने योग्य नियोजन करण्यात येत आहे. वारीच्या अनुषंगाने सर्व प्रकारची तयारी पूर्णत्वास जात आहे. तिची पाहणी करण्यात येणार असून, त्यांच्या मागण्यांचा पंढरपूर ते सभा घेण्यात येणार आहे.**

**– दीपक वैद्य**
**जिल्हा परिषद अध्यक्ष**

चार वर्षाच्या प्रशासकीय काळानंतर जिल्हा परिषदेवर लोकप्रतिनिधीचे नवीन करण्यात आले आहे. नवीन सदस्यांना जिल्हा परिषदेचे प्रशासनाची माहिती या त्रिपुर्वी तयारीची प्रत्यक्ष पाहणी करता येईल यासाठी सर्वसाधारण सभा पंढरपूरमध्ये घेण्यात येत आहे. आषाढी वारीसाठी जिल्हा प्रशासनाने तयारी सुरू केली आहे. वारकरी व भाविकांना सुख सुविधा देण्यासाठी तयारी केली आहे. त्याच्यावर भर दिला जात आहे. जिल्हा परिषद अध्यक्ष उपाध्यक्ष व सभापती व जिल्हा परिषद सदस्य पालखी मार्गावरील स्वच्छता पिण्याची पाणी, अन्य विकास कामाचा आढावा घेणार आहेत.



# संत ज्ञानेश्वर, व जगद्गुरु संत तुकाराम महाराज देहू आळंदी, संतभूमी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




पंढरपूर प्रतिनिधी – महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे महाराष्ट्रातील समस्त वारकरी संप्रदाय हा या पवित्र भूमिका मातृभूमी मानतो कौशल्य मूर्ती संत ज्ञानेश्वर माऊली जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांची जन्म कर्म आणि निर्वाणभूमी असणाऱ्या आळंदी देहू आणि तळगाव चिखली तळवडे या पंचक्रोशीतील वारकरी संप्रदाय मनोभावे नमन करून संतभूमी मानतो देहू ते आळंदी हा १६ किलोमीटरचा पालखी मार्ग राज्य सरकारने संतभूमी म्हणून जाहीर करावा. आळंदी देवस्थानची माजी मुख्य विश्वस्त अभय टिळक यांनी केली

पिंपरी येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत अभय टिळक बोलत होते, यावेळी ह भ प राजू महाराज ढोरे, डॉक्टर स्वाती मुळे, वारकरी संप्रदाय प्रतिनिधी ग्रामस्थ आणि उपस्थित होते.

यावेळी अभय टिळक यांनी सांगितले की ज्याप्रमाणे उत्तरांचल सरकारने देवभूमीनावाने काही परिसर जाहीर करून त्या परिसरात संरक्षण दिले आहे आणि तेथील पवित्र जपून विकास कामे केले आहेत त्याच धर्तीवर देहू ते आळंदी या पंचक्रोशीतील परिसर संतभूमी म्हणून जाहीर करावा तसेच या भूमीची सार्वजनिक स्वच्छता सामाजिक सुरक्षितता अखंड राखण्यासाठी शासनाने विशेष निधी देऊन विकास करावा अशी मागणी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच केंद्रीय मंत्री यांच्याकडे आम्ही करीत आ–होत यासाठी आवश्यक ते पत्र व्यवहार व पाठपुरावा केला जात आहे.

सरकारकडून मंजूर करून घ्यावा. पुढील महिन्यात होणाऱ्या पंढरपूर यात्रेच्या अगोदर महाराष्ट्रातील केंद्रीय मंत्री राज्यपाल, मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री, पालकमंत्री महाराष्ट्र विधान परिषद आणि विधानसभेचे सर्व आमदार राज्यसभा व लोकसभेचे सर्व खासदार पुणे आणि पिं–परी चिंचवड महानगरपालिका आणि या परिसरातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांची प्रतिनिधित्व यांना आम्ही संतभूमीजाहीर करण्याबाबतचे निवेदन देऊन पाठपुरावा करू तसेच वारकऱ्यांमध्ये आणि नागरिकांमध्ये देखील याबाबत जनजागृती केली जाईल असेही ह. भ .प. राजू महाराज ढोरे यांनी सांगितले

डॉक्टर स्वाती मुळे यांनी सांगितले की वाढत्या नागरिकांना मुळे या भागांमध्ये मागील पंधरा वर्षात वेगाने शहरीकरण झाले आहे संतपिट हायस्कूल प्रमाणे अनेक शैक्षणिक संस्था या परिसरात कार्यरत आहेत त्यामुळे वाहतूक वाढले आहे इंद्रायणी नदीच्या किनारी अनेक ठिकाणी प्रदूषित व अस्वच्छता पाणी थेट नदीत सोडले जात असल्याने दिसून येत आहे त्यामुळे नदी प्रदूषित होत आहे भविष्यात या पर्यावरणाचा प्रश्न गंभीर होण्याची भीती आहे ही पंचक्रोशी संतभूमी म्हणून जाहीर करण्यात झाल्यानंतर या समस्या सोडवण्यासाठी मदत होईल यासाठी आम्ही राज्य सरकारकडे प्रयत्न करणार आहोत.

# एलएलबी (पाच वर्ष) च्या ऑनलाईन कॅप रजिस्ट्रेशन प्रक्रियेला सुरवात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूरः 'गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयूट संचलित स्वेरी लॉ कॉलेजमध्ये बीए एलएलबी (पाच वर्षे) च्या कॅप रजिस्ट्रेशन प्रक्रियेस शुक्रवार, दि.१९ जून २०२६ पासून सुरूवात झाली असून ही प्रक्रिया गुरुवार दि. ९ जुलै २०२६ पर्यंत चालणार आहे. या प्रक्रियेला विद्यार्थी व पालकांचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे.' अशी माहिती गोप–ाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयुटचे संस्थापक डॉ.बी.पी. रोंगे यांनी दिली.




**दि. ९ जुलै पर्यंत चालणार प्रक्रिया**

सन २०२६–२७ करीता पाच वर्ष मर्यादा असलेल्या बीए एलएलबी प्रवेशासाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन करण्याकरिता स्वेरी म ध्ये सुविधा उपलब्ध आहे. पंढरपूर पंचक्रोशीतील व ग्रामीण भागातील विद्यार्थी व पालक यांच्यासाठी लॉ च्या प्रवेश प्रक्रियेचे मार्गदर्शन, पालकांचा होणारा संभ्रम, संबंधीत कागदपत्रे जमविताना होण–ारी अडचण व शंका याबाबत 'मार्गदर्शन सुविधा केंद्र' सुरु केले आहे. सदरच्या रजिस्ट्रेशनची प्रकिया दि. १९ जून २०२६ पासून ते दि. ९ जुलै २०२६ पर्यंत चालणार आहे. या पाच वर्ष कालावधी असलेल्या बीए एलएलबीच्या प्रवेशासाठी कोणत्याही शाखे–तून १२ वी परीक्षा उत्तीर्ण होणारे विद्यार्थी पात्र आहेत. रजिस्ट्रेशन प्रक्रियेनंतर मुख्य कॅप राऊंडसाठी ऑप्शन फॉर्म भरण्याची ऑनलाईन प्रक्रिया चालू होणार आहे. स्वेरीचे संस्थापक डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रवेशोच्छुक विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना मार्गदर्शन करण्यासाठी उच्चशिक्षित प्राध्यापकांची नियुक्ती करण्यात आली आहे. पाच वर्ष कालावधी असलेल्या बीए एलएलबी प्रवेशासंबंधी अधिक माहितीसाठी प्रवेश प्रक्रिया अधिष्ठाता प्रा. उत्तम अनुसे (मोबा.–९१६८६५५३६५) व प्रा. विक्रम पाटील (मोबा. नंबर–९०९६०१६६२५) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गौरव**

# प्रतिकूल परिस्थितीवर मात करत घडलेल्या 'फिनिक्स' पक्ष्यांचा 'वर्षा'वर सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई केतन भोज – संकटांवर मात करून शिक्षणाच्या बळावर शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या भारतीय जैन संघटना (इगड) संचालित वाघोली शैक्षणिक पुनर्वसन प्रकल्पाच्या (WERC) माजी विद्यार्थ्यांचा गौरव नुकताच एका विशेष सोहळ्यात करण्यात आला.राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'वर्षा' या अधिकृत निवासस्थानी हा भावूक आणि प्रेरणादायी अभिनंदन सत्कार सोहळा अत्यंत उत्साहात संपन्न झाला.

वाघोली शैक्षणिक पुनर्वसन प्रकल्पाच्या गेल्या ३२ वर्षांच्या दैदिप्यमान प्रवासात लातूरचे भूकंपग्रस्त, अनाथ, शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटुंबांतील तसेच आदिवासी समाजा–तील हजारो विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत–ले.आज हे विद्यार्थी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन करून समाजात मानाचे स्थान मिळवत आहेत. याच यशस्वी विद्यार्थ्यांच्या संघर्षमय आणि प्रेरणादायी जीवनप्रवासावर आधारित श्री. पद्माकर गोरे लिखित 'फिनिक्स (यशोगाथा)'या पुस्तकाचे प्रकाशन या सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

प्रतिकूल परिस्थितीवर केवळ शिक्षणाच्या आणि जिद्दीच्या बळावर मात कशी करता येते,याचे जिवंत उद–ाहरण म्हणजे हे विद्यार्थी आहेत.या विद्यार्थ्यांची बदललेली जीवनगाथा समाजासाठी नेहमीच दीपस्तंभासारखी काम करेल, असा सूर याप्रसंगी उमटला. या सोहळ्याला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,दिव्यज फाउंडेशनच्या संस्थापक श्रीमती अमृता फडणवीस,भारतीय जैन संघटनेचे (BJS) संस्थापक श्री.शांतिलाल मुथ्था,कु.दिविजा फडणवीस, विलास राठोड आणि इगड च्या मैनेजिंग डायरेक्टर कोमल जैन यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. शिक्षणाच्या माध्यमातून हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्यात आमूलाग्र बदल घडवून आणणाऱ्या WERC च्या या शैक्षणिक पुनर्वसन प्रकल्पाचे मुख्यमंत्र्यांनी कौतुक केले.हजारो वंचित आणि गरजू विद्यार्थ्यांच्या आयुष्याला कलाटणी देणारे हे अवाढव्य सेवाकार्य यशस्वीरीत्या पूर्ण पार पाडण्यात पंडित राठोड आणि संचित यादव यांचे अत्यंत महत्त्वपूर्ण व मोलाचे सहकार्य लाभले.हा सोहळा केवळ सत्कार सो–हळा न राहता, संघर्षातून यशाकडे गेलेल्या विद्यार्थ्यांच्या प्रेरणादायी जी–वनप्रवासाचा एक अभूतपूर्व उत्सव ठरला.





